जगभर

अमेरिकेचे परराष्ट्रीय 'धोरण' (!)

चन्द्रशेखर पुरन्दरे

ट्रम्पमहाशय अमेरिकेच्या अध्यक्षपदी आल्यापासून गेल्या चार महिन्यांतच देशांतर्गत आणि परराष्ट्रीय धोरणात दिशाहीनता व धरसोड दिसत आहे.

निवडणूक प्रचारादरम्यान व नंतरही रशियाचा सर्वेसर्वा पुतीन ट्रम्पना जवळचा होता. मग ट्रम्पने नियुक्त केलेल्या राष्ट्रीय सुरक्षा सल्लागाराला रशियाशी गैर जवळीक दाखवल्याच्या आरोपाखाली अल्पावधीतच राजीनामा द्यायला लागला. ही जवळीक ट्रम्पच्या स्वत:च्या अंगाशी येण्याचीही शक्यता आहे. ट्रम्प व त्यांचे साथीदार आणि रशिया यांच्यातील संबंधांची चौकशी अमेरिकेची (आपल्याकडच्या सी. बी आयसारखी) संस्था करत आहे. तिच्या प्रमुखाला ट्रम्पने मेमध्ये तडकाफडकी काढून टाकल्याने या प्रकरणाभोवतीचा संशय वाढला आहे.

या हकालपट्टीनंतर लगेचच म्हणजे मे च्या दुसऱ्या आठवड्यात रशियन परराष्ट्रमंत्री आणि अमेरिकेतील रशियाचा राजदूत यांनी ट्रम्पची भेट घेतली. त्यात मध्य-पूर्व, इस्लामिक स्टेट यांच्याबद्दल अमेरिकेकडे असलेली अति-गोपनीय माहिती ट्रम्पने त्यांना दिली असा आता नवीन आरोप आहे. अमेरिकेकडे याबाबत असणारी माहिती मोठ्या प्रमाणावर इस्राएलच्या गुप्तहेरखात्याने अमेरिकेला दिलेल्या माहितीवर आधारित आहे. ती रशियामार्गे इराणकडे जाऊ शकते आणि इराण-इस्राएल यांचे तर हाडवैर आहे. त्यामुळे इस्राएल व अमेरिका यांच्यातील संबंध ताणलेले आहेत. त्याचबरोबर इंग्रजी भाषिक पाच विकसित देश - अमेरिका, कॅनडा, ब्रिटन, ऑस्ट्रेलिया व न्यूझीलंड यांच्यात Five Eyes नावाची व्यवस्था आहे. त्याअंतर्गत त्या-त्या देशांची गुप्तहेर खाती जी आंतरराष्ट्रीय माहिती गोळा करतात ती एकमेकांना दिली जाते. ट्रम्प यांच्या सिद्ध बेभरवशामुळे ही व्यवस्था आता डळमळीत झाली आहे.

या तर्कदुष्ट वर्तणुकीची दोन-तीन उदाहरणे पाहू.

सीरिया व मध्य-पूर्व अमेरिकेने सीरियात जाऊ नये असे ट्रम्पचे कित्येक वर्षे मत होते. असदच्या राजवटीला तर अगदी ३० मार्चपर्यंत काहीच हरकत नव्हती. परराष्ट्रमंत्रीही तीच री ओढत होते - 'असदचे भवितव्य सीरियन ठरवतील.' बेचिराख होत असलेले सीरियन काय ठरवणार? पण तेव्हापर्यंत तो प्रश्न पडला नाही. कारण 'सीरिया इस्लामिक स्टेटशी लढत आहे आणि त्याला रशियाचा पाठिंबा आहे!' (यात परत रशियाशी जवळिक). असदचे उच्चाटन आणि इस्लामिक स्टेटचा पाडाव - या दोन उद्दिष्टांत ट्रम्प सरकारचा कायम गोंधळ आहे. असद चालेल, स्टेट नको; दोन्ही नकोत याबाबत उलटसुलट विधाने असतात. ट्रम्पपासून खाली परराष्ट्रमंत्री एक धोरण म्हणतो, राष्ट्रीय सुरक्षाप्रमुख दुसरे, संयुक्त राष्ट्रसंघातील प्रतिनिधी निराळेच. त्यात रशिया-असद-इराण यांच्या संगनमताबद्दल काय धोरण, हे संदिग्धच आहे.

सीरियन हत्याकांड चालू असल्याचा साक्षात्कार ट्रम्पना अचानक ४ एप्रिलला झाला. असदने रासायनिक अस्त्रांनी प्रौढांबरोबर लहान मुलांचे घेतलेले बळी टीव्हीवर दिसले. मग ही अस्त्रे ज्या विमानतळावरून सोडण्यात आली, तेथे अमेरिकेने क्षेपणास्त्रांचा हल्ला केला. सीरियातील भयानक नरसंहार टीव्हीवर गेली तीन-चार वर्षे तरी अखंड दिसत आहे, जगभरची वृत्तपत्रे या भीषण हत्याकांडाची नोंदही सतत घेत आहेत. पण ४ एप्रिलनंतर लगेच 'असदने आतापर्यंत फार वेळा मर्यादा उल्लंघल्या आहेत' अशी ग्वाही देण्यात आली. आता सीरियाच्या भविष्यात असदला काही भूमिका नसेल असे परराष्ट्रमंत्र्याने जाहीर केले. 'असदला हुसकावण्यासाठी आंतरराष्ट्रीय आघाडी उघडण्याची तयारीही चालू आहे.' तर 'क्षेपणास्त्रांच्या हल्ल्यानंतर अमेरिकेचे उद्दिष्ट साध्य झाले आहे' असे त्याच वेळी दुसऱ्या एका अधिकाऱ्याने म्हटले. म्हणजे, तो हल्ला ही एकाच वेळची कृती होती, दीर्घकालीन कारवाईचा भाग नव्हता असे ध्वनित झाले. मात्र रशियाने लगेच या हल्ल्यात नागरिक बळी पडल्याचा दावा केला आणि ट्रम्प-पुतीन भाई-भाई गजर संशयास्पद झाला. मुळात रशियाचे या प्रदेशातील हितसंबंध अमेरिकेपेक्षा अगदी निराळे किंबहुना विरोधात आहेत. सध्याच्या अनिश्चित अमेरिकन वर्तनामुळे रशिया आपल्या धोरणासाठी अमेरिकेचा वापर करेल ही भीती ट्रम्पच्या रिपब्लिकन पक्षातूनच व्यक्त होत आहे. तरी असदला व रशियाला जरा धक्का देणारा हा हल्ला स्वागतार्ह म्हणावा लागेल.

याला जोडून सीरियातील असदच्या तद्देशीय विरोधकांबाबतची भूमिका नक्की नाही. सीरियातील कुर्द लोक असद आणि तुर्कस्तान दोघांच्याही विरोधात आहेत आणि अमेरिका आपल्याला मदत करेल अशी त्यांची अपेक्षा आहे. पण तेही स्पष्ट नाही. यामुळे अमेरिका-तुर्कस्तान यांच्यात तणाव मात्र वाढत आहे. कारण कुर्द तुर्कस्तानातही आहेत आणि ते देशद्रोही असल्याचा, त्यांना सीरियन कुर्द पाठिंबा देतात असा त्या सरकारचा दावा आहे.

मध्यपूर्वेत इतरत्रही धोरणांची दिशा उर्वरित जगासाठी काळजीची आहे. ट्रम्पमहाशय इजिप्तच्या लष्करशहाचे, तुर्कस्तानच्या एकाधिकारी नेत्याचे - हुकूमशहाच खरे तर - दिलखुलास स्वागत करतात, त्यामानाने ब्रिटन, जर्मनीच्या राष्ट्र प्रमुखांचे स्वागत थंडे असते. पहिला परदेशी दौरा सुरु होतो तो सौदी अरेबियासारख्या आणखी एका हुकूमशाहीपासून. हे संकेत लोकशाहीधार्जिणे नाहीत आणि त्यात स्थानिक जनतेच्या वेदनांचे भानही नाही. जर्मनीच्या चॅन्सेलर मेर्केल या मध्यपूर्वेतील १० लाख निर्वासितांना जर्मनीत आश्रय देण्याचे धोरण राबवत आहेत. नेतृत्व असे असल्यास त्याचा तृणमूलाला उपयोग. ती क्षमता या अमेरिकन नेतृत्वात दिसत नाही.

अफगाणिस्तान

येथेही तर्कदुष्टता आहे. अफगाणिस्तानच्या संदर्भात एक महत्त्वाचा मुद्दा आहे. आज जवळजवळ निम्मा अफगाणिस्तान तलेबानच्या अखत्यारीखाली आहे. उरलेला सरकारच्या दुबळ्या नियंत्रणाखाली. इस्लामिक स्टेट (यापुढे स्टेट) अगदी तुरळक भागात आहे. स्टेट हा धोका जसा मध्यपूर्वेत आहे, तसा अफगाणिस्तानात नाही. स्टेटचे अस्तित्व जाणवते ते अधूनमधून होणाऱ्या आत्मघातकी हल्ल्यांमुळे. पण त्यामागे केंद्रीय नेतृत्व किंवा मध्य-पूर्वेतील स्टेटसारखे काही विशिष्ट नियोजन दिसत नाही. एक तर अफगाणिस्तानात अनेक हिंसक गट आहेत. त्यांची परस्परवैरे चालू असतात. त्यांची निष्ठाही बदलत असते. आज एका नावाने संघर्ष तर उद्या दुसऱ्या. एखादा हल्ला 'यशस्वी' झाला की त्याचे श्रेय स्टेटने घेणे किंवा त्या गटाने तसे म्हणणे हे दोघांनाही सोयीचे असते. आहे त्यापेक्षा अधिक ताकदीचा देखावा होतो.

त्यामानाने तलेबान संघटित आहे. त्यांना मिळणारा पाकिस्तानचा पाठिंबा हा अफगाणिस्तानचा खरा प्रश्न आहे.

वस्तुत: बिन लादेनने अफगाणिस्तानमध्ये आश्रय घेतल्यानंतर काही काळातच तलेबानने बऱ्याच वेळा अफगाण सरकारशी वाटाघाटी करण्याची तयारी दाखवली होती. त्यात मध्यस्थ म्हणून नॉर्वेसारख्या अलिप्त देशाने पुढाकारही घेतला होता. पण प्रत्येक वेळा पाकिस्तानने हे प्रयत्न उधळून लावले. आजही निकड तलेबानशी बोलणी करण्याची आहे. पाकिस्तानचा प्रभाव कमी करणे हे अमेरिकेचे धोरण होऊ शकते. पण ती शक्यताही ही राजवट चाचपणार नाही. 'सगळ्यात मोठा बॉम्ब' स्टेटच्या इलाख्यात टाकणे हे स्टेटला अवाजवी महत्त्व व फुकटची प्रसिद्धी देणे आहे. स्टेटला नेमके तेच हवे आहे. अमेरिका आपल्याला लक्ष्य करते हा त्यांच्या बडेजावाचा भाग होतो आणि नवीन अनुयायी मिळण्याची शक्यताही वाढते.

दूरदृष्टीचा अभाव आणि वस्तुस्थितीचे अज्ञान (प्राधान्यक्रम पाकिस्तान हवा, स्टेट नाही) यावर आधारित दंडेलशाही हे धोरण होऊ शकत नाही. त्याने सामान्य अफगाण जनतेच्या हालात भर मात्र पडते.

उत्तर कोरिया

हा देश अण्वस्त्रसज्ज आहे. तो याबाबत पाकिस्तानपेक्षाही बेजबाबदार आहे. अण्वस्त्रक्षमता त्याने पाकिस्तानकडून आंतरराष्ट्रीय नियमांना झुगारून छुपेपणे मिळवली. संयुक्त राष्ट्रसंघाचे निषेध न मानता ही क्षमता जगाला सतत दाखवण्याची राजवटीला हौस आहे. तेथील राजवट गेले तीन पिढ्या हुकूमशाही आहे.

चीन हा या देशाचा एकमेव पाठीराखा. चीन उत्तर कोरियाला का सहन करतो?

दक्षिण कोरिया हा उत्तर कोरियाचा शेजारी देश लोकशाही आहे. त्या दोघांचे जमत नाही. द. कोरिया अमेरिकेच्या संरक्षणछत्राखाली आहे. हे संरक्षण उत्तर कोरियापासून आहे आणि चीनपासूनही. अमेरिका द. कोरियात क्षेपणास्त्रांचे स्थानक उभारत आहे आणि तीस ते पस्तीस हजार अमेरिकन सैनिकांचाही तेथे तळ आहे. या गोष्टी व 'चिनी' समुद्रातील अमेरिकेचे वाढते आरमार हे चीनला आपल्या प्रभावक्षेत्रावरचे आक्रमण वाटते. त्यामुळे अमेरिकेवर हल्ला करू शकतील अशी क्षेपणास्त्रे आपल्याकडे तयार आहेत या उ.कोरियाच्या क्षेपणास्त्रांच्या चाचण्यांकडे चीन कानाडोळा करतो.

परवापरवापर्यंत ट्रम्पची भाषा उत्तर कोरियाला लष्करी धडा शिकवण्याची होती. एप्रिलमध्ये चीनच्या अध्यक्षाबरोबर भेट झाल्यावर हे मत लगेच बदलले. आता उत्तर कोरियाला काबूत ठेवण्याचा प्रयत्न चीनच करू शकेल असे धोरण आहे. चीनला गोंजारण्यासाठी निवडणूकप्रचारातील चीन-विरोधी कर्कश वक्तव्ये बंद झाली. उदा. चीन अमेरिकेवर व्यापारी कुरघोड्या करत आहे, आंतरराष्ट्रीय चलनात चीन चालबाजी करतो, वगैरे. पण अमेरिकेच्या मदतीने पुढे-मागे द. कोरिया उ. कोरियावर आक्रमण करेल व दोन्ही कोरिया चीनविरोधात एकत्र येतील ही चीनची भीती आहे. म्हणून उ. कोरियाला आपण 'समजावत' आहोत पण तो प्रश्न शेवटी अमेरिकेलाच सोडवावा लागेल ही चीनची अघोषित भूमिका राहणार, याची जाणीव ट्रम्प राजवटीला दिसत नाही.

ट्रम्पचे देशांतर्गत व देशाबाहेरील प्रश्न पाहता ही राजवट चार वर्षे टिकेल का याचीच आज शंका येते.

Email - artnondeco@yahoo.co.uk
Website - www.art-non-deco.com